श्री.फ्रान्सीस जॉकी फर्नांडीस वगैरे वि.

श्री. संजीव इंदुराव देसाई वगैरे

## निशाणी क्रमांक ४८ व ४९ वरील एकत्रीत आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांनी वादीच्या दाव्यास कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होवून त्यांच्याविरूध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारण्याची विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ यांच्या मते, त्यांना कैफियत दाखल करावयाची असते याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याच्या कामी कैफियत दाखल करणेस सुमारे पाच वर्षे आठ महिन्यांचा विलंब झालेला आहे. तसेच प्रतिवादी क्र.१ तर्फे वकील श्री. जावेद सय्यद हे ब्रेन हॅम्ब्रेज या आजाराने आजारी असल्याने त्यांनी कैफियत दाखल करणेबाबत नवीन विधिज्ञांशी संपर्क साधून माहिती घेतली. कैफियत दाखल न करण्यामागे त्यांचा कोणताही निष्काळजीपणा नव्हता. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरूध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून कैफियत स्वीकारण्याची विनंती केलेली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्ज जास्तीत जास्त खर्च आकारुन फेटाळणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने प्रतिवादींविरुध्द ठराव व कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.१ यांना दाव्याचे समन्सची बजावणी झालेची दिसून येते. प्रतिवादी क्र.१ हे दि.१९/१२/२०१८ रोजी सदर कामात हजर झालेले आहेत. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी दिनांक ०९/१२/२०२४ रोजी दिलेला आहे. यावरून असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.१ यांना कैफियत देण्यास विलंब झालेला आहे. सदरचा विलंब प्रतिवादी क्र.१ यांनी जाणुन बुजून केलेला नाही असे कथन केलेले आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागण्याकरीता प्रतिवादी क्र.१ यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ आपले प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यामुळे प्रस्तुत अर्जातील प्रतिवादींचे कथन विचारात घेण्यास कोणतीही हरकत दिसून येत नाही. परंतु कैफियत दाखल करणेस

झालेला विलंब व त्या अनुषंगाने वादीची झालेली गैरसोय योग्य तो खर्च आकारुन भरुन काढणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रतिवादी क्र.१ यांचा नि.४८ वरील अर्ज वादीस खर्चादाखल रक्कम रूपये ५००/- (रु.पाचशे मात्र) देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांचा नि.४९ वरील अर्ज मंजूर करणेत येतो.

३. प्रतिवादी क्र.१ विरूध्द 'विना कैफियत' असा पारीत झालेला आदेश रद्द करण्यात येतो.

४. प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेस वा तत्पूर्वी वादीस देणेची आहे.

५. प्रतिवादी यांनी नि.४८ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतरच त्यांची कैफियत अभिलेखावर नोंदविण्यात येईल.

६. प्रतिवादी क्र.१ यांनी खर्चाची रक्कम वादीस देण्यास कसूर केल्यास प्रस्तुतचा आदेश आपोआप रद्द होईल.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.01.07 10:48:10 +0530

दिनांकः- ०६/०१/२०२५ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाणः- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर),

सावंतवाडी